मंगळवार दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी दु.३.३० वाजता Google Meet द्वारे Online पद्धतीने नाशिक जिल्ह्यातील बेकरी प्रॉडक्टस् निर्मिती करणा-या उद्योजकांसमवेत निर्यात संबंधी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.

Online सभेस उपस्थित असलेल्या सभासद व उद्योजक यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम श्री.संदिप पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांनी सर्व Online उपस्थितांचे स्वागत करून सभा बोलविण्याचा उद्देश विषद केला. तसेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत अस्तित्वात असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

यावेळी श्री.मिलींद जहागिरदार, मे.जहागिरदार बेकरी प्रॉडक्ट्स यांनी असे सांगितले की, सध्या त्यांचे कंपनीमार्फत सिंगापूर येथे त्याचे बेकरी प्रॉडक्टस् निर्यात करीत आहेत. यावेळी त्यांना निर्यात करताना येणा-या अडचणी सभेत सांगितल्या. त्यात (१) आंतरराष्ट्रीय खरेदीदार शोधण्याकरीता शासनामार्फत आंतरराष्ट्रीय Buyer-Seller Meet घेण्यात यावे अशी अपेक्षा केली. (२) तसेच त्यांचे प्रॉडक्टस् प्रदर्शित Display करण्याकरीता आंतरराष्ट्रीय प्रदर्शन (International Exhibition) भरविण्यात यावे अशी अपेक्ष केली. (३) तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने Common Testing Lab शासनाने उपलब्ध करून द्यावी अशीही अपेक्षा व्यक्त केली. (४) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने बेकरी प्रॉडक्टस् पॅकींग करणेकरीता अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध शासनामार्फत उपलब्ध करून द्यावी.

त्यानंतर सिमला फुड प्रॉडक्टस् चे प्रतिनिधी यांनी सांगितले की, त्यांचेकडील नमकीन फरसान हे कुवेत या देशात निर्यात होत असून ते एक्सपोर्ट ट्रेडर मार्फत निर्यात करतात. त्यांनी सांगितले की उत्पादीत मालाचे लाईफ वाढण्याच्या दृष्टीने पॅकींग करणेकरीता Nitrogen Flushing सारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याच्या दृष्टीने शासनामार्फत प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

त्यानंतर श्री.अभिषेक जाधव, प्रतिनिधी, मे.अभिषेक बेकरी यांनी त्यांच्या कंपनीत उत्पादीत होत असलेल्या प्रॉडक्टस् ची माहिती दिली.

यावेळी महाव्यवस्थापक, जिउकें यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सर्व बेकरी प्रॉडक्ट निर्मिती करणा-या उद्योजकांनी एकत्र येवून त्यांची संघटना स्थापन करावी व संघटना स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत सामाहिक सुविधा बेकरी उत्पादकांना घेता येतील, याबाबत माहिती दिली.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.

Online उपस्थित असलेल्या सभासदांची यादी.

१) श्री.संदिप पाटील, महाव्यवस्थापक, जिउकें, नाशिक.
२) श्री.अक्षय राऊत, निर्यात समन्वयक, नाशिक
३) मिलिंद जहागिरदार, जहागिरदार बेकरी, नाशिक
४) प्रतिनिधी, सिमला फुड प्रॉडक्टस्, नाशिक
५) श्री.अभिषेक जाधव, मे.अभिषेक बेकरी प्रॉडक्ट्स, नाशिक
६) प्रतिनिधी, अतुल डेअरी प्रॉडक्टस्, नाशिक
७) श्री.अंकित अग्रवाल, मे.लार्रडस् फुडस् प्रॉडक्टस्, नाशिक.
८) प्रतिनिधी, प्रकाश बेकरी, नाशिक.